www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक **युवक आधार** मराठी

दैं.युवक आधार करीता
प्रतिनिधी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , आलिबाग खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापूर, अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर प्रतिनिधी नेमने आहे.
9220403509 संपर्क 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले श्री. सुरेश आत्माराम भोईर

मुख्य संपादक – सौ भारती संतोष आमले उपसंपादक – श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक – श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक – श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २ अंक : 931 वा गुरुवार दि. २३ जानेवारी २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514

# जळगाव रेल्वे दुर्घटना



## १२ मृतांमध्ये ३ महिला, पाच जणांची ओळख पटली

जळगाव : १२ मृतांमध्ये ३ महिला, पाच जणांची ओळख पटली रेल्वे अपघातातील मयत १२ प्रवाशांमध्ये ८ पुरुष,एक दहा वर्षीय बालक आणि तीन महिलांचा समावेश आहे.सर्वच मृतदेह शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात आणले गेले आहेत. आतापर्यंत पाच मयतांची ओळख पटली आहे. जळगाव जिल्हाधिकारी कार्यालयातील ०२५७-२२१७१९३ या क्रमांकावर हेल्पलाईन सेवा उपलब्ध करण्यात आली आहे. घटनास्थळी जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, खासदार स्मिता वाघ, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, पोलीस अधीक्षक डॉ.महेश्वर रेड्डी, रेल्वेचे वरिष्ठ अधिकारी, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.किरण पाटील, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे (जीएमसी) अधिष्ठाता डॉ.गिरीश ठाकूर दाखल झाले आहेत. जळगाव, पाचोरा, जामनेरहून ६० रुग्णवाहिका घटनास्थळी दाखल झाल्या आहेत. तसेच जीएमसीतील डीएनए चाचणी एक पथक घटनास्थळी दुसरे पथक शासकीय रुग्णालयात सक्रीय झाले आहे.

जळगाव जिल्हाधिकारी कार्यालय, जळगाव, पाचोरा, भडगाव आणि भुसावळ तहसीलदार कार्यालयात नियंत्रण कक्ष तातडीने कार्यान्वीत करण्यात आले आहेत. जखमींसह मयतांच्या नातेवाईक, वैद्यकीय यंत्रणा आणि जखमींसाठी बेड उपलब्ध करण्यासाठी निवासी उपजिल्हाधिकारी संजय गायकवाड यांच्याकडे समन्वयाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. त्यांच्या मदतीला पाचोरा तहसीलदार विजय बनसोडे आहेत. तर जीएमसीत दाखल होणाऱ्या जखमींवर उपचारासाठी मदतकार्याची सुत्रे अप्पर जिल्हाधिकारी अंकुश पिनाटे यांच्यावर जबाबदारी सोपविण्यात आली.

'आयएमए'ला मागितली मदत निवासी उपजिल्हाधिकारी संजय गायकवाड यांनी इंडियन मेडीकल असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांशी चर्चा करुन सर्वच डॉक्टरांना उपचार कार्यात सहभागी होण्यासाठी आवाहन केले. सचिव डॉ.अनिता भोळे यांनी तयारी दाखविल्यानंतर आयएमएच्या पथकाने जीएमसी आणि जिल्हा रुग्णालयात मदतकार्य सुरु केले.

घटना अतिशय दुर्दैवी आणि वेदनादायी आहे. मी जिल्हा प्रशासनाच्या संपर्कात आहे. संपूर्ण परिस्थितीवर लक्ष ठेऊन आहे. गिरीश महाजन घटनास्थळी दाखल झाले आहेत.जखमींच्या उपचारासाठी तातडीने व्यवस्था करण्यात आली आहे. **-देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री**

माहिती मिळताच घटनास्थळी पोहोचलो आहे. सद्यस्थितीत कार्यकर्त्यांच्या मदतीने मदतकार्य हाती घेतले आहे. मयत व जखमींच्या आकड्याविषयी अधिकृत माहिती रेल्वे प्रशासनच जाहीर करणार आहे. **-गिरीश महाजन, जलसंपदा मंत्री**

## तूराडे ग्रामपंचायत कार्यालयाचे शेकाप नेते प्रीतम म्हात्रे यांच्या हस्ते लोकार्पण

**दैनिक युवक आधार पनवेल वार्ताहर**
तुराडे ग्रामपंचायतीच्या नुतन इमारत कार्यालयाचे लोकार्पण शेकाप नेते आणि पनवेल पालिकेचे माजी विरोधी पक्ष नेते प्रीतम म्हात्रे यांच्या हस्ते रविवार दिनांक १९ जानेवारी २०२५ रोजी पार पडले. तुराडे ग्रामपंचायतीचा यापुढील कारभार नवीन इमारतीतून होईल आणि ग्रामस्थांना एक पारदर्शक सेवा ग्रामपंचायतच्या माध्यमातून मिळेल अशी आशा व्यक्त करून ग्रामपंचायत सरपंच- उपसरपंच ,सर्व सदस्य, ग्रामसेवक आणि ग्रामस्थांना प्रीतम म्हात्रे यांनी शुभेच्छा(**पान २ वर** )



## सांस्कृतिक महोत्सवाचा सोहळा संपन्न

**दैनिक युवक आधार नवीन पनवेल वार्ताहर**
पनवेलच्या बार्न्स कॉलेज ऑफ आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स पनवेल मध्ये १८ जानेवारी ते २२ जानेवारी २०२५ या कालावधीत सांस्कृतिक महोत्सवाचा भव्य सोहळा संपन्न झाला.
स्टुडन्ट कॉन्सिल विभागाच्या वतीने आयोजित या महोत्सवात बॉलीवूड डे, मिस्टर आणि मिस बार्न्स स्पर्धा, ट्रॅडिशनल डे, नो बॅग डे, गँग डे, खाऊ गल्ली यांसारख्या विविध उपक्रमांनी महाविद्यालयाचा उत्साह द्विगुणित केला.

या महोत्सवाचे उद्घाटन डॉ. शिवदास कांबळे यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य कल्पेश भोईर, उपप्राचार्या के.डी. शारा, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष प्रमुख प्रा. अंजु सोंखला व सर्व प्राध्यापक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.(**पान २ वर** )



## गुरुवारपासून उलवा नोडमध्ये 'नमो चषक'

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**
लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नावाने भारतीय जनता युवा मोर्चा पनवेल व उरणच्या वतीने दिनांक २३, २४ व २५ जानेवारीला उलवा नोडमध्ये आयोजित करण्यात आलेल्या 'भव्य क्रीडा महोत्सव' अर्थात 'नमो चषक २०२५' चे स्पर्धेचे उदघाटन गुरुवार दिनांक २३ जानेवारी रोजी सकाळी १० वाजता मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे.

उलवा नोडमधील सेक्टर १२ येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कुलच्या पाठीमागील बाजूच्या मैदानावर होणाऱ्या या नमो चषकचे उद्घाटन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि कोकण म्हाडाचे माजी सभापती बाळासाहेब पाटील यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी प्रमुख मान्यवर म्हणून पनवेल विधानसभा मतदार संघाचे आमदार प्रशांत ठाकूर, उरण विधानसभा मतदार संघाचे आमदार महेश बालदी, कोकण पदवीधर मतदार संघाचे आमदार निरंजन डावखरे, विधानपरिषद आमदार विक्रांत पाटील, युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष अनुप मोरे, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, नमो चषकाचे मुख्य आयोजक व पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर, भाजपचे जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, युवा मोर्चाचे प्रदेश सरचिटणीस निखिल चव्हाण, प्रदेश उपाध्यक्ष सुनील राणा, भाजपचे उरण तालुकाध्यक्ष रवी भोईर, पनवेल शहर अध्यक्ष अनिल भगत, कामोठे अध्यक्ष रविंद्र जोशी, खारघर अध्यक्ष प्रविण पाटील, कळंबोली अध्यक्ष रविनाथ पाटील, उलवे नोड अध्यक्ष अमर म्हात्रे, उलवे १ अध्यक्ष निलेश खारकर, उलवे २ अध्यक्ष विजय घरत, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर तसेच स्थानिक स्वराज्य संस्थेचे लोकप्रतिनिधी यांच्यासह इतर पदाधिकाऱ्यांची उपस्थिती असणार आहे.



## रेल्वे प्रवाश्याच्या सुरक्षिततेबाबत विशेष बैठक





**दैनिक युवक आधार किशोर गुडेकर मुबंई - पनवेल लोहमार्ग पोलीस ठाणे तर्फे रेल्वे प्रवाश्याच्या सुरक्षिततेबाबत मंगळवार दि.२१ जानेवारी,२०२५ रोजी पनवेल रेल्वे पोलीस ठाणे वपोनि संजय चव्हाण याच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली विशेष बैठक घेण्यात आली, यावेळी पीआय जब्बार तांबोळी,महाराष्ट्र रेल्वे प्रवाशी महासंघ व नवी मुंबई रेल्वे प्रवासी वेल्फेअर असो. अध्यक्ष तथा सेंट्रल कमिटी सदस्य ( ZRUCC Member ) श्री.अभिजीत धुरत व आर.पी.आय्.(आर्.के )चे अध्यक्ष मा.राजाराम खरात साहेब,अश्वत्थामा ज्येष्ठ नागरिक संघ नवीन पनवेलचे अध्यक्ष श्री.प्रकाश विचारे,समाजसेविका रत्नमाला पाबळेकर,अ‍ॅड संजय गंगनाईक, डिप्टी स्टेशन मॅनेजर राकेश तिवारी, अ‍ॅड यशवंत पाटील, महासंघाचे रायगड जिल्हाध्यक्ष सुर्यकांत वाघमारे,रेणूका सांळुखे, संजीवनी पोसतांडेल सुरेन्द्र नेमळेकर,, श्रीविदया सरवणकर,एसके पाटील, डीजी मगरे, साहेबराव जाधव, काशीनाथ भोईर, चंदोदय वाघमारे,मोठ्या संख्येने रेल्वे प्रवासी उपस्थित होते**

## कळंबोली येथे श्री संत वामन भाऊ महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्त तीन दिवसीय नामसप्ताह

**दैनिक युवक आधार पनवेल प्रतिनिधी**
कळंबोली येथील सेक्टर चार मध्ये श्री स्वामी समर्थ मंदिर येथे श्री संत वामनभाऊ व श्री संत भगवान बाबा यांच्या संयुक्त पुण्यतिथी निमित्त तीन दिवशी अखंड नाम संकीर्तन सोहळा होणार आहे . या सोहळ्या मध्ये सोमवार दिनांक २०/०१/२५ रोजी दुपारी ४ ते ६.००पालखी प्रदक्षिणा होणार आहे . व संध्याकाळी ह भ प भागवत भास्कर श्री रोहिदास महाराज गर्जे यांचे कीर्तन होणार आहे . मंगळवार दिनांक २१/०१/२५ रोजी आदिनाथ महाराज डोळे यांचे कीर्तन होणार आहे . तसेच बुधवार दिनांक २२/०१/२५ सकाळी ११.०० ते १३.०० या वेळेत ह भ प महंत रामकृष्ण महाराज शास्त्री मठाधिपती श्री क्षेत्र विठ्ठल गड यांचे सुश्राव्य असे काल्याचे किर्तन होणार आहे . या सोहळ्यासाठी प्रमुख उपस्थिती पनवेलचे कार्यसम्राट आमदार माननीय प्रशांत दादा ठाकूर हे उपस्थित राहणार आहेत या सोहळ्याचा सर्वांनी आनंद घ्यावा व या कार्यक्रमास सहभागी व्हावे असे आवाहन मंडळाचे पदाधिकारी सर्वश्री बबन बारगजे माजी नगरसेवक बबन मुकादम , श्री आजिनाथ जायभाये विजय गर्जे , श्रीकृष्णा गर्जे यांनी केले आहे




## जबरी चोरी करणारा सराईत गुन्हेगार जेरबंद जबरी चोरीचे एकुण 05 गुन्हे उघडकीस



**दैनिक युवक आधार मराठवाडा विभागीय प्रतिनिधीः-राजू शिंदे.**
जालना शहरातील पोलीस ठाणेच्या हद्दीमध्ये बऱ्याच दिवसांपासुन जबरी चोरीचे गुन्हे घडत होते, त्याअनुषंगाने गुन्हे उघडकीस आणणे बाबत मा. पोलीस अधीक्षक श्री. अजयकुमार बंसल साहेबांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव यांना सुचना दिल्या होत्या. त्याअनुषंगाने पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा जालना यांनी पथकातील अधिकारी व अंमलदार यांना जबरी चोरीचे गुन्हे उघडकीस आणणेबाबत सुचना देवुन मार्गदर्शन केले होते. त्याअनुषंगाने दिनांक 21/01/2025 रोजी स्थानिक गुन्हे शाखेतील पोलीस अधिकारी व अंमलदार हे जबरी चोरी करणारे चोरांची माहिती घेत असतांना त्यांना त्यांच्या गुप्त बातमीदारांमार्फत माहिती मिळाली कि, पोलीस ठाणे सदर बाजार जालना गुरनं 808/2024 कलम 309,3(5) भा. न्या.सं. मधील गुन्हा हा आरोपी नामे मुकेश ऊर्फ अशोक भिकाजी तरकसे रा. कन्हैयानगर






# २३ जानेवारी नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती

**नेताजी सुभाषचंद्र बोस भारताचे तेजोमय क्रांतीकारी योध्दा.**

भारत स्वातंत्र्य करण्यासाठी देशात दोन नद्यांचा उगम झाला. एक मवाळवादी तर दुसरी जहालवालवादी यांच्या संगमानेच १५ ऑगस्ट१९४७ ला भारत स्वतंत्र झाला.२३ जानेवारी १८९७ला ओडिसा मधील कटक शहरात जन्माला आलेले नेताजी भारतासाठी चमकता तारा सिध्द झाले व स्वतंत्र भारतासाठी महान योध्दा म्हणून उदयास आले. नेताजींनी १५ वर्षाच्या वयातच स्वामी विवेकानंदांचे सर्व साहित्य वाचून काढले व देश निर्माण करण्याची ज्वाला प्रज्वलित झाली आणि देश स्वतंत्र करण्यासाठी संपूर्ण ताकदीनिशी संघर्षाला सुरुवात केली.कोलकत्यातील जेष्ठ स्वातंत्र्य सैनिक देशबंधू चित्तरंजन दास यांच्या कार्याने नेताजी प्रभावीत झाले व त्यांच्या सोबत काम करायला सुरुवात केली. २० जुलै १९२१ रोजी महात्मा गांधी व सुभाषचंद्र बोस सर्वप्रथम एकमेकांना भेटले.यावेळी गांधीजींनीसुध्दा नेताजींना दासबाबू सोबत काम करण्याचा सल्ला दिला.कारण चित्तरंजन दास हे बंगाली वकील व भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील अग्रणी पुढारी होते.त्यामुळे त्यांना देशबंधू असे संबोधले जात असे. १९२५ साली इंग्रजांच्या लक्षात आले की नेताजी क्रांतीकारकांशी संबंध ठेवतात व क्रांतीकारकांचे स्फुर्तीस्थान असल्याचे त्यांच्या लक्षात आले.ह्या कारणास्तव इंग्रज सरकारने सुभाषबाबूंना अटक केली व कोणताही खटला न चालवीता त्यांना अनिश्चित काळासाठी म्यांमारच्या कारागृहात बंदिस्त केले.नेताजींचा संपूर्ण प्रवास अत्यंत संघर्षमय व खडतड रहाला. कारण त्यांच्या व सहकाऱ्यांच्या रक्ताता-रक्तात स्वातंत्र्याची ज्वाला धगधगत होती.त्यांचे एकच स्वप्न होते ते म्हणजे भारत स्वतंत्र करणे यासाठीच त्यांनी विदेशी वारी करून इंग्रजाच्या दुश्मन राष्ट्रांशी हातमिळवणी करून भारतीय संघर्षाचा मोठा लढा आझाद हिंद सेनेच्या नेतृत्वात उभा केला. तेव्हाच १५ ऑगस्ट १९४७ ला स्वतंत्र भारत उदयास आला. कारण इंग्रजांना देशातून पळवून लावण्यात आझाद हिंद सेनेचा मोठा वाटा आहे. आझाद हिंद सेनेची स्थापना पहिल्यांदा २९ आक्टोंबर १९१५ ला राजा महेंद्र प्रताप सिगं यांनी केली.त्यावेळी आझाद हिंद सरकारची सेना म्हणून ओळखली जायची.यांचा उद्देश भारताला इंग्रजांपासुन स्वतंत्र करने.जेव्हा दक्षिण-पूर्वी एशियामध्ये जापानच्या सहयोगाने नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी ४० हजार भारतीय स्त्री-पुरूषांना प्रशिक्षीत करून सेनेत सहभागी केले त्याला सुद्धा आझाद हिंद फौज असे नाव देण्यात आल्यानंतर सुभाषचंद्र बोस यांना आझाद हिंद सेनेचा सर्वोच्च कमाण्डर नियुक्त केल्यानंतर आझाद हिंद सेनेची संपूर्ण कमान नेताजी सुभाषचंद्र बोस यांना सोपविण्यात आली आणि सुभाषचंद्र बोस यांचा क्रांतीकारी लढा सुरू झाला. नेताजी १९३३ पासून १९३६ पर्यंत युरोपमध्ये रहाले.तो काळ जर्मनच्या हिटलरचा नाझीवाद आणि इटलीचे नेते मुसोलिनीचा फासीस्टवाद असा होता. यांनी भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात सर्वतोपरी मदत करण्याचे वचन दिले.कारण या दोघांच्या निशाण्यावर इंग्लंड हाच देश होता. कारण इंग्लंडचे जगाच्या ७५ टक्के देशावर अधिपत्य होते. त्यामुळे इंग्लंडचा जगावर अतीरेक वाढत होता.कारण इंग्लंडने पहिल्या विश्व युध्दानंतर जर्मनीवर एकतर्फी करार लादण्यात आले होते. त्याचाच बदला जर्मनी इंग्लंड कडून घेणार होता. भारतावरसुध्दा इंग्रजांचे राज्य होते.त्यामुळे याच संधीचा फायदा घेण्याचे नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी मनात ठानले व नेताजींनी हिटलर व मुसोलिनी यांच्याशी हातमिळवणी केली. १९४३ मध्ये त्यांनी जर्मनीला सोडून ते जापानला जाऊन पोहोचले.जापानचे प्रधानमंत्री जनरल हिदेकी तोजो यांनी त्यांना सर्वोतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले. जापानमधून सिंगापूरला गेले.वयोवृध्द क्रांतीकारी रासबिहारी बोस ह्यांनी सिंगापूर येथील "फेरर पार्कमध्ये भारतीय स्वातंत्र्य परिषदेचे नेतृत्व सुभाषबाबूंकडे सोपवीले.त्याचप्रमाणे सिंगापूर इथे कॅप्टन मोहन सिंग व्दारा स्थापित "आझाद हिंद सेनेची"कमान आपल्या हाती घेतली.भारताला स्वतंत्र करण्यासाठी आझाद हिंद सरकारची स्थापना केली.तसेच "आझाद हिंद सेना" गठीत केली.या संघाचे प्रतीक चिन्ह असलेल्या झेंड्यावर डरकाळी मारणाऱ्या वाघाचे चित्र होते.कारण नेताजींची संपूर्ण कार्यशैली वाघासारखीच होती. आझाद हिंद सेनेने १८ मार्च १९४४ रोजी भारतभूमीत प्रवेश केला व माऊडॉक येथे त्यांनी भारताचा तिरंगा फडकावला. नेताजी ४ जुलै १९४४ ला बर्मा पोहचले. तेथुनच त्यांनी भारतीयांसाठी नारा दिला " तुम मुझे खून दो मैं तुम्हे आझादी दुंगा".१९३९ ला गांधी विचारधारेला हरवुन नेताजींची कॉंग्रेसचे अध्यक्ष म्हणून नियुक्ती झाली.यावर महात्मा गांधी म्हणाले की सुभाषचंद्र बोस यांचा विजय व माझा पराजय आहे.गांधीजींच्या या वक्तव्याने व विचारांमुळे सुभाषचंद्र बोस यांचे मन दुःखावले व स्वतःहुन कॉंग्रेस सोडली. कारण महात्मा गांधी मवाळवादी तर सुभाषचंद्र बोस जहालवादी विचारांचे होते.परंतु दोघांचाही लढा भारत स्वातंत्र्यासाठीच होता.१९४४ मध्ये अमेरिकन पत्रकार लुई फिशर ह्यांच्याशी चर्चा करतांना महात्मा गांधींनी नेताजींना "देशभक्तांचा देशभक्त" असा उल्लेख केला होता. तर ४ जुन १९४४ ला सिंगापूरवरून एक संदेश देतांना सुभाषचंद्र बोस यांनी महात्मा गांधी यांना राष्ट्रपिता महात्मा गांधी म्हणुन संबोधले तेव्हा पासून महात्मा गांधींना राष्ट्रपिता संबोधल्या जावु लागले.त्यामुळे महात्मा गांधींनी अहिंसेचा मार्ग अवलंबला तर नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी क्रांतीकारीचा मार्ग अवलंबला. दोघांचाही लढा भारत स्वातंत्र्यासाठीच होता. त्यामुळेच १५ ऑगस्ट१९४७ ला भारत स्वतंत्र झाला.१८ ऑगस्ट १९४५ ला भारतासाठी दुःखद समाचार आला नेताजी सुभाषचंद्र बोस टोकियोला जातांना तैवान येथील तैहोको जवळ हवाई दुर्घटने दरम्यान नेताजींचा मृत्यू झाला व त्यांचे स्वप्न अधुरे रहाले. त्यांच्या निधनाने संपूर्ण देश स्तब्ध झाला. परंतु त्यांचे मृत शरीर अजुनही मिळाले नाही.म्हणुनच नेताजींच्या मृत्युच्या कारणांवर आज देखील विवाद सुरू असल्याचे दिसून येते.आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी आपली वाममार्गाने कमवीलेली संपूर्ण धनसंपत्ती देशहितासाठी स्वखुशीने खर्च केली तर ही खरी देशभक्ती ठरेल व नेताजींना खरी आदरांजली समजल्या जाईल.आजच्या युवा पिढीमध्ये नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे आचार-विचार जागृत होने गरजेचे आहे.कारण देश निर्माण,देशाची प्रगती,देशाचा विकास नेताजींच्या विचारांनीच जलदगतीने पुढे जावु शकतात.त्याच बरोबर मी देशवासियांना आग्रह करेल की नेताजींच्या१२८ व्या जयंतीचे औचित्य साधून प्रत्येकांनी एकतरी वृक्ष लावावेत व देशात १२८ कोटी वृक्ष एकाच दिवशी लावण्याचा संकल्प सरकारनी, संघटनांनी व जनतेनी घ्यावा.यामुळे संपूर्ण भारत निसर्ग रम्य होवून प्रदूषणावर मात करण्यात आपण यशस्वी होवू.सुभाषचंद्र बोस यांच्या १२८ व्या जयंती निमित्त कोटी कोटी प्रणाम !जय हिंद !

**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**(माजी विद्यापीठ प्रतिनिधी नागपूर)**

# आई गावदेवी चषकाचे अंबिवली येथे आयोजन

**दैनिक युवक आधार नवीन पनवेल वार्ताहर**

प्रकाश झोतातील मर्यादित षटकांचे ग्रामीण क्रिकेट सामन्यांचे आयोजन आई गावदेवी चषक, आंबिवली येथील सुरेश घनसोलकर मैदानावर 26 जानेवारीपर्यंत करण्यात आले आहे. यावेळी प्रथम पारितोषिक एक लाख रुपये आणि चषक, द्वितीय पारितोषिक 50 हजार रुपये आणि चषक, तृतीय पारितोषिक 25 हजार रुपये आणि चषक, चौथे पारितोषिक 25 हजार रुपये आणि चषक, पाचवे पारितोषिक 25 हजार रुपये आणि चषक, सहावे पारितोषिक 25 हजार रुपये आणि चषक आहे. यावेळी मॅन ऑफ द सिरीज मोटरसायकल, फलंदाज आणि गोलंदाजासाठी सायकल आणि क्षेत्ररक्षकासाठी कुलर भेट देण्यात येणार आहे. हे सामने पाहण्यासाठी प्रेक्षकांची गर्दी होत आहे.

# मुंबईकरांचे आधारवड, शताब्दी टॉवर उभे करण्याचे एकनाथ शिंदे यांचे निर्देश






दैनिक युवक आधार मुंबई,(केतन भोज); केईएममध्ये येणाऱ्या रुग्णांना जागा कमी पडू नये यासाठी रुग्णालयात आयुष्मान शताब्दी टॉवर उभे करावे,असे निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बुधवार,२२ जानेवारी रोजी दिले.केईएम रुग्णालयाच्या शतक महोत्सवी समारंभात ते बोलत होते.सेठ गोवर्धनदास सुंदरदास वैद्यकीय महाविद्यालय आणि केईएम रुग्णालयाच्या ९९ वा वर्धापन दिन सोहळा रुग्णालयाच्या प्रांगणात पार पडला.यावेळी आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर, आमदार कालिदास कोळंबकर, सुनील शिंदे, मुंबई महापालिका आयुक्त भूषण गगराणी, अतिरिक्त आयुक्त विपिन शर्मा, केईएमच्या अधिष्ठाता डॉ. संगीता रावत उपस्थित होते.उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, "केईएम रुग्णालय हे रुग्णसेवेचे अखंड व्रत घेतलेले मुंबईकरांचे खऱ्या अर्थाने आधारवड आहे. केईएमने घेतलेले रुग्णसेवेचे व्रत अवघड आहे. आजही इथली रुग्णसेवा अहोरात्र चालू आहे. इथल्या डॉक्टरांचे, नर्सेसचे, कर्मचाऱ्यांचे आभार मानावे तेवढे कमी आहेत. ते आहेत म्हणून सामान्य मुंबईकर आज जगतो आहे. घरातल्या आधारवडासारख्या बुजुर्ग व्यक्तीबद्दल आपल्याला आदरभाव असतो, आपुलकी असते. तशीच भावना केईएमबद्दल आहे. आज केईएम रुग्णालय हे देशातील सर्वोत्तम रुग्णालयांपैकी एक आहे. केईएम हे कुटुंब आहे. त्यामध्ये प्रत्येक व्यक्तीची काळजी घेतली जाते. आरोग्य क्षेत्राच्या नव्या दिशा आणि आंतरराष्ट्रीय मानके केईएमने स्थापित केली आहेत," असे ते म्हणाले.ते पुढे म्हणाले की, "केईएम सारखी रुग्णालये ही सर्वसमान्यांसाठी देवदूतासारखी आहेत. या रुग्णालयात झिरो प्रिस्किप्शन पॉलिसी लागू करावी. केईएममध्ये येणाऱ्या रुग्णांना जागा कमी पडू नये यासाठी शताब्दी महोत्सवी वर्षात आयुष्मान टॉवर उभे करावे. तसेच रुग्णाच्या नातेवाईकांची परवड होवू नये यासाठी व्यवस्था निर्माण करण्याचे उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले. याठिकाणी डॉक्टरांचे म्युझियम करण्यात यावे," अशा सूचना त्यांनी दिल्या.

## नळदुर्ग येथे ट्रक व मोटरसायकल अपघातामध्ये अमित नागणे या तरुणाचं जागेत मृत्यू..

**दैनिक युवक आधार संतोष पुदाले**
**तुळजापूर धाराशिव**

सोलापूर - हैदराबाद नळदुर्ग येथील जुना नाका राष्ट्रीय महामार्गावर दि.१९ जानेवारी रोजी सकाळी साडेसात वाजण्याच्या समोरास मालवाहतूक आणि मोटरसायकल यांच्यात धडक होऊन झालेल्या अपघातामध्ये नळदुर्ग येथील युवक अमित खंडू नागणे वय (३५) या युवकाचा गंभीर जखमी होऊन जागीच ठार झाला तर त्यांचा बंधू शिवराम खंडू नागणे हा जखमी झाला आहे याबद्दल संताप्त झालेल्या नागणे कुटुंब व नळदुर्ग शहरातील नागरिकाच्या वतीने जवळपास दोन ते तीन तास राष्ट्रीय महामार्गावर ठिय्या मारून आंदोलन कार्यकर्त्यांनी महामार्ग बंद केला होता त्यामुळे चार किलोमीटर वाहनांची रांग लागली होती सकाळी साडेसात ते आठच्या दरम्यान नळदुर्ग येथील शिवराम खंडू नागणे व अमित खंडू शिंदे या दोन्ही सख्ये भाऊ आपली मोटरसायकल वरून नेहमीप्रमाणे आपलं घर जवळ असणाऱ्या शेताकडे चालले होते नळदुर्ग शहरातून राष्ट्रीय महामार्गावर आल्यानंतर नळदुर्गकडून उमरगाकडे जाणाऱ्या मालवाहतूक मालट्रक क्र. जी.जे.३६ व्ही.(८२६८ )या मालट्रकने पाठीमागून



अमित व शिवराम नागणे यांच्या मोटर सायकलला जोरात धडक दिली या धडकेने मोटरसायकल खाली पडली यावेळी अमित नागणे वय वर्ष ३५ हा महामार्गावर पडल्यानंतर तो मालट्रकाच्या चाकाच्या बंपरला अडकला ट्रक चालकाने त्यावेळी गाडी न थांबवता बेधडक चालवीत तसेच पुढे घेऊन गेला यावेळी तब्बल २०० फूट लांब ट्रक चालकाने अमितला फरफडत नेले यामध्ये गंभीर जखमी होऊन अमित जागीच ठार झाला तर दैव बलवत्तर म्हणून अमितचा भाऊ नागणे शिवराम हा जो मोटरसायकल चालवीत होता तो माहमार्गावर न पडता पलीकडच्या बाजूला पडला म्हणून तो बचावला यामध्ये तो किरकोळ जखमी झाला आहे तीन तासांनंतर नळदुर्ग पोलीस स्टेशनचे सहायक पोलिस निरीक्षक गजेंद्र सरोदे व त्यांच्या सहकाऱ्यांनी आंदोलन कृत्याची समजुत काढून येणाऱ्या ३० जानेवारी पर्यंत राष्ट्रीय महामार्गवातुक नळदुर्ग बायपास रस्ता सुरु करू तसेच या अपघातास कारणीभूत असणाऱ्या विरुध्द कडक कारवाई करणयाचे आश्वासन दिल्याने आंदोलन कृत्यांनी आपल्या आंदोलन मागे घेतली यानंतर अमित नागणे यांची अंत्यविधी आलियाबाद स्मशानभूमी येते करण्यात आले यावेळी बलभीम मुळे कमलाकर चव्हाण संतोष पुदाले विनायक अहंकारी ज्योती येडगे या सर्वांनी श्रद्धांजली अर्पण करण्यात आले

## उरण तालुक्यातील अल्पवयीन मुलीवर झालेल्या अत्याचाराविरोधात महिलांच्या संतापाचा उद्रेक.

**नराधमाला भर चौकात विवस्त्र करून चोप द्या अशी महिलांकडून संतप्त प्रतिक्रिया.**

**दैनिक युवक आधार**
**तृप्ती भोईर उरण /प्रतिनिधी**

उरण येथील मोरा येथे रहाणाऱ्या तीन वर्षीय चिमुरडी वर शेजारी राहणाऱ्या ५० वर्षीय दिनेश नितेकर या इसमाने अमानवी कृत्य केल्याच्या निषेधार्थ अत्याचार करणाऱ्या आरोपीला कठोरात कठोर शिक्षा व्हावी अशी मागणी उरण ची जनता करीत आहे.

१३ जानेवारी रोजी पिडीत मुलगी घरासमोर खेळत असताना शेजारील दिनेश नितेकर यांनी केलेल्या अत्याचाराविरोधात आरोपीस पाच दिवसाची पोलीस कस्टडी ठेवण्यात आली आहे. दिनांक २१ जानेवारी रोजी उरण पोलीस ठाण्यात या विषयावर संतप्त महिलांनी एकत्र येऊन अत्याचाराविरोधात आवाज उठवला.त्याचबरोर सायंकाळी सहा वाजता मोरा येथील श्री एकविरा आईच्या मंदिर परिसरात महिला आघाडीच्या नेत्या सिमाताई



घरत यांच्या नेतृत्वाखाली एकत्र येऊन आरोपीला फास्ट ट्रॅक वर शिक्षा होऊन पिडीत चिमुरडीला न्याय मिळावा म्हणून जमलेल्या महिलांच्या सह्यांचा अर्ज मोरा पोलीस ठाण्यात देण्यात आला.

यावेळी पिडीत मुलगी, तीची आई व काकी तीथे हजर होत्या. पिडीतेच्या काकीने घडलेला अमानुष प्रकार व त्यानंतर त्यांना मिळालेली वागणूक याविषयी सविस्तर कथन केले. उरण सामाजिक संस्था महिला विभाग अध्यक्षा सिमाताई घरत, जनवादी महिला अध्यक्षा हेमलता पाटील,सामाजिक कार्यकर्ते नरेश रहाळकर शहर अध्यक्षा नयना पाटील, वंदना पवार, दिपा कोळी, सामाजिक कार्यकर्त्या प्रिया शहा, सरिता पत्रकार पुजा पवार, तृप्ती भोईर व बहुसंख्येने मोरा उरणमधील महिला हजर होत्या. जमलेल्या सर्व महिलांनी मोरा पोलीस स्टेशनला अर्ज सादर करताना त्यावेळी ए सीपी विशाल नेहूल सर, मोरा पोलीस स्टेशन अधिकारी कांबळे पी. आय सर , उरण पोलीस स्टेशनचे जितेंद्र मिसाळ साहेब उपस्थित होते.

मानवतेला काळीमा फासणाऱ्या या घटनेच्या आरोपीस भर चौकात विवस्त्र करून चोप दिला पाहिजे नाहीतर ताबडतोब फाशी देण्यात यावी अशी मागणी उरण च्या समस्त महिला वर्गाकडून करण्यात येत आहे.

# चंदनाची झाडे चोरी करणाऱ्या सराईत गुन्हेगारास सिंहगड रोड पोलिसांनी मुद्देमालासह केले अटक




**दैनिक युवक आधार पुणे विभागीय प्रतिनिधी सुनील कलशेट्टी**

पुणे (दि .२२ जानेवारी २०२५)--- सिंहगड रोड पोलीस स्टेशन हद्दीतील चंदनाचे झाडाचे चोरी करणाऱ्या सराईत गुन्हेगारास सिंहगड रोड पोलिसांनी मुद्देमालासह शिताफीने केले अटक गुन्हा रजि नं ३५/२०२५ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०३(२) गुन्हा दाखल होता. पोलिसांकडून सविस्तर मिळालेली माहिती अशी की, दाखल गुन्ह्याच्या अनुषंगाने दिनांक १७/१/२०२५ रोजी तपास पथकातील सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन निकम, पोलीस उपनिरीक्षक संतोष भांडवलकर, पोलीस हवालदार (ब नं ३८८) केकाण, पो. शिपाई (ब नं ८३४२) पाटील, पो. शिपाई (ब नं ९१९१) क्षीरसागर, पो. शिपाई ( ब नं ९१८३) ओलेकर, पो शिपाई (ब नं ०३) मोहिते पो. शिपाई (ब नं ८६९०) पांडोळे, असे सिंहगड रोड पोलीस स्टेशन हद्दीत वरिष्ठांचे आदेशाने गुन्हे प्रतिबंधात्मक पेट्रोलिंग करीत असताना पोलीस अंमलदार शिवाजी क्षीरसागर यांना त्यांच्या खास बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, प्रयोजिसटी समोरील कॅनॉल लगत वडगाव पुणे येथे एक संशयित इसम थांबले असल्याचे खात्रीशीर बातमी मिळाल्याने मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक सिंहगड रोड पोलीस स्टेशन पुणे यांना कळविले असता त्यांनी सदर ठिकाणी जाऊन खात्री करून एक गीते पुढील कार्यवाही करण्यासाठी आदेश दिल्याने वरील स्टाफसह मिळालेल्या बातमीची ठिकाणी जाऊन पाहणी करता सदर ठिकाणी एक संशयित इसम हा त्यांचे खांद्यावर पांढऱ्या रंगाचे पोते घेऊन एका आड बाजूस थांबलेला दिसला त्यावेळी आम्हास त्यांचा संशय आल्याने आम्ही सोबतचे स्टाफचे मदतीने त्यास आहेत त्या परिस्थितीत पकडून त्याचे नाव व पत्ता विचारला असता. त्याने त्याचे नाव भरत शिवाजी जाधव ( वय ३४ वर्ष रा केडगाव चौफुला गडदे वस्ती ता दौंड जि पुणे) असे असल्याचे सांगितले. त्याचे जवळ असलेल्या पांढऱ्या रंगाच्या पोत्यामध्ये तो काहीतरी लपवत असल्याचा संशय आल्याने त्याचे ताब्यातील पांढऱ्या रंगाच्या पोत्याची पाहणी करता त्यामध्ये १,०००,००/ रूपये किंमतीचे अर्धवट तोडलेले चंदनाच्या झाडाचे तुकडे मिळून आले. त्याचे ताब्यात मिळून आलेल्या चंदनाच्या झाडाच्या तुकड्या बाबत त्याच्याकडे जागीच तपास करता त्याने सदरचे चंदनाचे तुकडे हे दि १६/१/२०२५ रोजी मानस धायरी परिसर येथून चोरी केल्याचे सांगितल्याने त्यास दाखल गुन्ह्यात दि १७/१/२०२५ रोजी अटक करण्यात आली असून सदर आरोपी हा गुन्हेगार असून त्याचे विरुद्ध यवत पोलीस स्टेशन पुणे व हवेली पोलीस स्टेशन पुणे येथे देखील चोरीचे गुन्हे दाखल असून पुढील अधिक तपास संतोष भांडवलकर पोलीस उपनिरीक्षक सिंहगड पोलीस स्टेशन पुणे हे करीत आहे. सदरची कामगिरी मा श्री अमितेश कुमार सो पोलीस आयुक्त पुणे शहर, मा श्री रंजन कुमार शर्मा सह पोलीस आयुक्त पुणे शहर, महा प्रवीण कुमार पाटील अप्पर पोलीस आयुक्त सो पश्चिम प्रादेशिक विभाग पुणे शहर, मा संभाजी कदम सो पोलीस उपयुक्त परिमंडळ -०३ पुणे शहर, श्री अजय परमार सो साहाय्यक पोलीस आयुक्त सिंहगड रोड विभाग पुणे शहर, श्री दिलीप दाईंगडे सो वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री उत्तम भजनावळे सो पोलीस निरीक्षक (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री सचिन निकम, पोलीस उपनिरीक्षक संतोष भांडवलकर, आबा उतेकर, पोलीस अंमलदार संजय शिंदे, उत्तम तारू, अण्णा केकाण, अमोल पाटील, विनायक मोहिते, शिवाजी क्षीरसागर, राहुल ओलेकर, देवा चव्हाण, सागर शेंडगे, विकास पांडुळे, विकास बांदल, स्वप्निल मगर यांचे पथकाने केली.

## तूराडे ग्रामपंचायत कार्यालयाचे शेकाप नेते प्रीतम म्हात्रे यांच्या हस्ते लोकार्पण

**(पान १ वरुन)-** दिल्या. यावेळी वाढदिवसाच्या निमित्ताने अभिष्टचिंतन करून केक कापून प्रीतम म्हात्रे याना शुभेच्छा देण्यात आल्या.

बदलत्या काळाबरोबर रायगड जिल्ह्यातील ग्रामपंचायती सुद्धा अद्ययावत होत आहेत याबद्दल समाधान वाटते. यावेळी प्रीतम म्हात्रे यांच्यासोबत त्यांची पत्नी सौ. ममता प्रितम म्हात्रे, सौ. रंजना गायकवाड (सरपंच तुराडे), सौ. राजश्री राजेश पाटील (सरपंच देवळोली), सौ. उमाताई मुंडे (सरपंच वासांबे), सौ. मालती संतोष वाघमारे (उपसरपंच तुराडे), श्री. देवेंद्र अनंत पाटील (उपसरपंच देवळोली), श्री. चंद्रकांत नानाभाऊ (मा. सरपंच तुराडे), कु. रिया माळी (मा. उपसरपंच), सौ. ताराबाई सुरेश ठाकूर, श्री. सुरेश आत्माराम ठाकूर, सौ. मयुरी मयूर देवघरे, सौ. नेत्रा घरत, श्री. शंकर ढवळे, सौ. साधना नरेश ठाकूर व सर्व तुराडे ग्रामपंचायत सदस्य उपस्थित होते.

## सांस्कृतिक महोत्सवाचा सोहळा संपन्न

**(पान १ वरुन)-**

महोत्सवातील मिस्टर बार्न्स आणि मिस बार्न्स स्पर्धा विद्यार्थ्यांसाठी आकर्षणाचा मुख्य केंद्रबिंदू ठरली. या स्पर्धेसाठी प्रा. प्रशांत पाटील, प्रा. मयुरी वडके, आणि प्रा. हर्षदा लोखंडे यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. त्यांच्या न्याय व अभ्यासपूर्ण निर्णयांमुळे या स्पर्धेला विशेष प्रतिष्ठा मिळाली. या महोत्सवाने विद्यार्थ्यांच्या कौशल्यांना वाव मिळवून दिला आणि महाविद्यालयाच्या वातावरणाला नवीन रंग भरले. हा सांस्कृतिक महोत्सव विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी आणि आनंददायी ठरला. बार्न्स कॉलेजने यशस्वीरीत्या सादर केलेल्या या कार्यक्रमाची सर्वत्र प्रशंसा होत असून, विद्यार्थ्यांसाठी हा एक अविस्मरणीय अनुभव ठरला आहे.

## जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पिंपळस रामाचे यांची जिल्हास्तरीय खो खो स्पर्धेसाठी निवड.

**दैनिक युवक आधार**
**उत्तर महाराष्ट्र विभागीय संपादकः विनोद गायकवाड**

निफाड :. निफाड तालुक्याच्या जिल्हा परिषद अध्यक्ष चषक स्पर्धा सरस्वती विद्यालय निफाड येथे पार पडल्या असून सदर स्पर्धांचे उद्घाटन निफाड तालुक्याचे आमदार दिलीप काका बनकर यांच्या हस्ते करण्यात आले. निफाड तालुक्याच्या गटशिक्षणाधिकारी सौ. लता भारसट मॅडम तसेच शिक्षण विस्तार अधिकारी श्री. कैलास बोरसे व श्री. गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण स्पर्धा पार पडल्या. या तालुकास्तरीय अध्यक्ष चषक स्पर्धा मध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पिंपळस रामाचे यांनी सहभाग नोंदवून तालुकास्तरीय खो-खो स्पर्धा



मध्ये प्रथम क्रमांक मिळवला. तसेच समूह नृत्य या प्रकारामध्ये तालुकास्तरीय स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवला आहे. तसेच वीरा ज्ञानेश्वर महाजन या विद्यार्थिनीची जिल्हास्तरीय नृत्य स्पर्धेसारही निवड झाली. खो-खो चा अंतिम सामना जिल्हा परिषद शाळा पिंपळस रामाचे(सायखेडा बिट) व जिल्हा परिषद शाळा कारसूळ( पिंपळगाव बिट) यांच्यात होऊन पिंपळस रामाचे या संघाने उत्कृष्ट खेळ करत संघाला विजयश्री मिळून दिला जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पिंपळस रामाचे या संघाची जिल्हास्तरावर निवड झाल्याबद्दल मुख्याध्यापक राजेंद्र दुसाने , पिंपळस रामाचे सरपंच ,उपसरपंच एसएमसी अध्यक्ष, उपाध्यक्ष सदस्य

या सर्वांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या ..

**दैनिक युवक आधार** (RNI NO :- MAHMAR/2023/89514) **हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.**

**daily YUVAK ADHAR (RNI NO :- MAHMAR/2023/89514) Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle**

# केळवणे गावात नेत्ररोग शिबिराचे आयोजन

**दैनिक युवक आधार जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/एम.डी.भोईर**
मंगलवार २१ जानेवारी रोजी शांतीलाल संघवी आय इन्स्टिट्यूट यांच्या सौजन्य ने आणि आणि श्री वेताळ वाघेश्वर स्वयं सहायता समूह व श्री गावदेवी भवानी माता मंदिर ट्रस्ट केळवणे यांच्या सहयोगाने केळवणे गावातील भवानी मंदिरात नेत्र शिबिर हा कार्यक्रम उत्तम प्रकारे पार पडला. या कार्यक्रमाचे उद्घाटन श्री गावदेवी भवानी माता मंदिर ट्रस्ट चे अध्यक्ष जिल्हा परिषद सदस्य श्री ज्ञानेश्वर दशरथ घरत तसेच पनवेल तालुका उप तालुकाप्रमुख डॉक्टर श्री भरत घरत तसेच डॉक्टर श्री जितेंद्र जाधव सर यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाला पिरकोनचे उरण तालुका उपाध्यक्ष भारतीय जनता पार्टी श्री मुकुंद बबन गावंड, माजी जिल्हा परिषद सदस्य श्री जीवन भाई गावंड, तसेच दिघाटी मा. सरपंच अमित भाई पाटील तसेच केळवणे गावातील आशा वर्कर सौ. सीता ज्ञानेश्वर पाटील आणि त्यांची पूर्ण टीम तसेच श्री वेताल वाघेश्वर स्वयं सहायता समूह बचत गट उपाध्यक्ष श्री






मनिषा नितीन म्हात्रे आणि त्यांची पूर्ण टीम. सदर कार्यक्रमात उरण तालुका उपाध्यक्ष बीजेपी मुकुंद गावंड यांनी सर्व शिबिरास आलेल्या रुग्णांना मार्गदर्शन केले आणि मार्गदर्शन करताना त्यांनी सांगितले की सदर पिरकोन गावात दीडशे लोकांच्या ऑपरेशन झाले आहेत. तरी संपूर्ण केळवणे गावात मोतीबिंदू असलेले सर्व रुग्ण हे पूर्णपणे बरे व्हावे यासाठी शांतीलाल संघवी नेहमी कार्यरत राहील. सदर कार्यक्रमात १४९ रुग्ण आलेले होते त्यापैकी ४९ रुग्णांना मोतीबिंदू झालेला होता त्यापैकी १६ रुग्णांना एस एस आई वडाला येथे ऑपरेशन साठी नेले .

# निष्ठावंत कार्यकर्त्यांना योग्य संधी देणार : स्थानिक संस्थांच्या निवडणुकीसाठी खासदार रवींद्र चव्हाण यांनी आव्हान

**दैनिक युवक आधार नांदेड प्रतिनिधी चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर**
नांदेड : काँग्रेस पक्षाला अनेकांनी संपवण्याचा प्रयत्न केला पण काँग्रेस काही संपली नाही. कारण काँग्रेस पक्ष तळागाळातील कार्यकर्त्याच्या बळावर टिकून आहे. नेते आले आणि गेले तरी कार्यकर्ते मात्र आजही टिकून आहेत. येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत निष्ठावंतांनाच संधी देवून जिल्ह्यावर काँग्रेसचा झेंडा फडकवून दाखवू असे प्रतिपादन खा. रवींद्र चव्हाण यांनी कार्यकर्ता मेळाव्यात केले
लोकसभा पोटनिवडणुकीत काँग्रेसचा खासदार निवडून आला तरी विधानसभेला मात्र मोठ्या पराभवाला सामोरे जावे लागल्याने जिल्ह्यात काँग्रेस नेत्यात अस्वस्थता निर्माण झाली आहे. तर दुसरीकडे भाजप आणि राष्ट्रवादी अजितपवार गटाने पक्ष विस्तारासाठी काँग्रेसच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांना गळाला लावण्याचा जोरदार प्रयत्न करत आहेत.
त्यामुळे जिल्ह्यात काँग्रेसला




चांगलीच गळती लागली आहे. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील काँग्रेसच्या तालुकाध्यक्ष व प्रमुख पदाधिकाऱ्यांची विस्तारित बैठक नायगाव येथे दि. 19 जानेवारी रोजी घेण्यात आली. यावेळी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीबाबत मंथन करण्यात आले.या बैठकीच्या अध्यक्षस्थान जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष माजी आ. हाणमंतराव पाटील बेटमोगरेकर होते.या पुढे बोलताना खा. चव्हाण म्हणाले, जिल्ह्यात संघटन बांधणीवर भर दिला जाणार असून तळागाळातील कार्यकर्त्यांना पक्षाच्या मुख्य प्रवाहात आणून त्यांना न्याय व संधी देण्याचा वेगळा पॅटर्न निर्माण केला जाणार आहे. अध्यक्षीय समारोपात हाणमंतराव पाटील बेटमोगरेकर म्हणाले, स्व. खा.वसंतराव चव्हाण यांच्या खंबीर नेतृत्वामुळे मी पक्ष निष्ठा जपली आणि मी सर्वधर्म समभावाचा पाईक असल्याने जातीयवादी पक्ष कधीच स्वीकारणार नाही. स्व. वसंतराव चव्हाण यांनी अडचणीच्या काळात जिल्हातील काँग्रेस पक्ष सांभाळला,याची नोंद केंद्रीय नेतृत्वाने घेतली असून ही तमाम नांदेडकरांसाठी अभिमानास्पद बाब आहे. नांदेडचे राजकीय वजन दिल्ली दरबारी वाढले आहे. यापूढे हा पक्ष कानात बोलणाऱ्या कार्यकर्त्यांचा राहणार नाही, तर प्रत्यक्ष बुथस्तरावर, गावपातळीवर ज्यांनी पक्ष वाढविला, त्यांचाच हा पक्ष राहणार आहे आणि तेच उतराधिकारी राहतील,असा त्यांनी कार्यकर्त्यांना विश्वास दिला आहे

# अलिबागचा सफेद कांदा आरोग्यास औषधी व गुणकारी

दैनिक युवक आधार निलेश फुंडे रेवदंडा पांढऱ्या कांद्याची अलिबाग तालुक्यात लागवड पूर्ण झाली असून, फेब्रुवारीत तो बाजारात विक्रीस येण्याची शक्यता आहे. कृषी विभागातर्फे ३ एकरमध्ये कांदा बी तयार केले आहे. त्यामुळे पुढल्या वर्षी लागवड क्षेत्र वाढण्याची शक्यता आहे. अलिबाग तालुक्यात नेहुली, कार्ले, वाडगाव, वेशवी, धोलपाडा, रुळे, खंडाळे, सागाव, तळवली या गावांत अडीचशे हेक्टर क्षेत्रावर पांढरा कांद्याची लागवड केली जाते.यंदा पावसाचा मुक्काम वाढल्याने डिसेंबर महिन्यात लागवड करण्यात आली होती. बी तयार होऊन जानेवारी ती पूर्ण करण्यात आली. कांद्यासाठी वातावरण उत्तम असल्याने यंदा पीक बहरणार आहे.अलिबागचा पांढरा कांदा हा गुणकारी आणि औषधी असल्याने त्याला बाजारात प्रचंड मागणी आहे. कांद्याला भौगोलिक मानांकन प्राप्त झाले आहे. त्यामुळे अलिबागच्या कांद्याला स्वतः ची ओळख मिळाली आहे.यंदाही अडीचशे हेक्टर क्षेत्रावर लागवड करण्यात आलेली आहे. फेब्रुवारी महिन्याच्या पहिल्या आठवड्यापासून कांदा काढणीला सुरुवात होणार आहे.*कांद्याचा गोडवा कशामुळे? गंधक हा मुख्य घटक असलेले 'अलिल प्रोफाइल डायसल्फाइड' हे संयुग कांद्यात असते. म्हणून त्याला तिखटपणा येतो आणि डोळ्यांत पाणी येते. अलिबाग भागातील जमिनींमध्ये गंधकाची कमतरता आहे. त्यामुळेच या मातीतील कांदा गोड लागतो. तिखटपणाशी संबंधित आणखी एक घटक म्हणजे पायरुविक असिड. अलिबागच्या विशेषतः ओल्या कांद्यात त्याचेही प्रमाण कमी असते. साठवणुकीत त्याचे प्रमाण थोडे वाढते. *माळा बांधण्याचं वैशिष्ट्य*अलिबागच्या कांद्याचं जगात एकमेवाद्वितीय असलेलं वैशिष्ट्य म्हणजे हा कांदा कधीच सुटा विकला न जाता माळेच्या रूपातच विकला जातो. कलाकौशल्य पणास लावून अत्यंत आकर्षक व रचनाबद्ध पद्धतीने ही माळ तयार केली जाते. अनुभवाच्या शिदोरीवर अलिबागचे शेतकरी आणि स्थानिक मजूर त्यात पारंगत झाले आहेत. माळ तयार करणं हे काही एक–दोन दिवसांचं काम नाही. ती संपूर्ण प्रक्रिया आहे आणि तिचं विशिष्ट तंत्र आहे. काढणीनंतर कांदा पंधरा दिवस शेतात वाळवला जातो. ऊन लागून तो हिरवा पडू नये म्हणून त्यावर पात्या पसरवून तो व्यवस्थित झाकला जातो. कांदा हिरवा झालाच तर त्याचे मार्केट खाली आलेच म्हणून समजा. पंधरा दिवसांनी मग कांदा पोत्यात भरून आणला जातो. माळा बांधण्याचं काम पहाटेच सुरू होतं. सकाळी जे दव पडतं त्या ओलाव्यावर लहान मुलींच्या वेण्या बांधाव्यात तशा पाती व त्याच्यासोबतचा कांदा एकमेकांत खुबीने गुंफण्याचं काम केलं जातं. या प्रक्रियेत चूक झाली तर पातीचा तुकडा पडतो. माळ फसते. सुकलेली पाती वापरली तर बांधणी नीट होत नाही.

# पनवेल वाहतूक पोलिसांकडून वर्षभरात 70 हजार 513 जणांवर कारवाई

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)** पनवेल शहर वाहतूक पोलिसांनी जानेवारी ते 31 डिसेंबर 2024 या गत 12 महिन्यात तब्बल 70 हजार 513 जणांवर कारवाई केली.तसेच नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांकडून पाच कोटी 39 लाख 45 हजार तीन रुपयांचा दंड आकारण्यात आला.
पनवेलमध्ये वाहतुकीच्या नियमांचे सर्रासपणे उल्लंघन केले जात आहे. दुचाकीवरून तीन ते चार सीट प्रवास करणे, रिक्षांमधून पुढच्या सीटवर प्रवासी बसवणे, विद्यार्थी वाहनातून कोंबून विद्यार्थ्यांना नेणे, ट्रक, हायवा, डंपरमधून अधिकचे गौण खनिज नेताना दिसून येतात. अनेक वाहन चालक वाहन चालवताना मोबाईलवर बोलताना दिसून येतात. तर अनेक दुचाकी चालक हेल्मेट परिधान करत नाहीत. त्यामुळे अपघात झाल्यानंतर अनेकांचा जीव जातो. त्यामुळे हेल्मेट परिधान करणे आवश्यक आणि तितकेच गरजेचे देखील आहे. पनवेल शहर वाहतूक शाखेकडून वर्षभरात 21 हजार 509 विना हेल्मेट वाहन चालकांवर कारवाई केली असून त्यांच्यावर एक कोटी 61 लाख 21 हजार 500 रुपये इतका दंड आकारण्यात आला आहे. या कारवाईत वाहन चालवताना मोबाईलचा वापर करणाऱ्या 1133 जणांवर कारवाई करण्यात आली असून 25 लाख 35 हजार रूपयांचा दंड आकारण्यात आला. ट्रिपल सीट वाहतूक करणाऱ्या 659 जणांवर सहा लाख 58 हजारांचा दंड आकारण्यात आला. चार चाकी वाहनांमध्ये सीट बेल्ट न वापरणाऱ्या 2 हजार 216 जणांकडून चार लाख 42 हजार 400 रुपयांचा दंड आकारण्यात आला. नो पार्किंग मध्ये वाहन पार्क करणाऱ्या 14 हजार 779 जणांकडून एक कोटी 15 लाख 17 हजार पाचशे रुपयांचा दंड आकारण्यात आला. तर मद्य प्राशन करणाऱ्या 124 जणांवर कारवाई करण्यात आली. आणि तीस हजार 83 इतर केसेस असून त्यांच्याकडून दोन कोटी 26 लाख 70 हजार 603 रुपयांचा दंड आकारण्यात आला आहे.

# लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने एक हजाराची लाच स्विकारतांना मुख्याध्यापकास पकडले.

## मुख्याध्यापकासह शिक्षण विस्तार अधिकारी संशयित आरोपी.

दैनिक युवक आधार जळगाव जिल्हा प्रतिनिधी समाधान पाटील
एरंडोल–शाळेच्या इंस्पेक्शनचा चांगला शेरा लिहावा यासाठी शिक्षण विस्तार अधिका–यांना दहा हजार रुपये द्यावे लागणा आहेत असे सांगून शाळेतील शिक्षकाकडून एक हजाराची लाच स्विकारतांना पिंपळकोठा (ता.एरंडोल) येथील जिल्हा परिषद मराठी मुलांच्या शाळेतील मुख्याध्यापकास लाच लुचपत प्रतिबंधक पथकाने रंगेहाथ पकडले.याप्रकरणी मुख्याध्यापकासह पंचायत समिती शिक्षण विभागाचे शिक्षण विस्तार अधिकारी यांनाही संशयित आरोपी करण्यात आल्यामुळे शिक्षण क्षेत्रात खळबळ उडाली आहे. याबाबत माहिती अशी,की पिंपळकोठा (ता.एरंडोल) येथील जिल्हा परिषद मराठी मुलांच्या शाळेचे इंस्पेक्शन शिक्षण विस्तार अधिकारी जे.डी.पाटील यांनी सोमवारी (ता.१३) केले होते.शाळेच्या इंस्पेक्शनवर चांगला शेरा लिहावा यासाठी शिक्षण विस्तार अधिकारी जे.डी.पाटील यांनी दहा रुपयांची मागणी केली असल्याचे शाळेचे मुख्याध्यापक बळीराम सुभाष सोनवणे (वय–५५) यांनी सहकारी शिक्षकांना सांगितले.शाळेतील शिक्षकांकडून मुख्याध्यापक बळीराम सोनवणे यांनी प्रत्येकी एक हजार रुपये यापूर्वीच स्वीकारले होते तर दोन शिक्षकांनी पैसे देण्यास विरोध करून जळगाव येथील लाच लुचपत विभागाकडे तक्रार केली.लाच लुचपत विभागाच्या पथकाने तक्रारीप्रमाणे चांसमक्ष पडताळणी केली असता मुख्याध्यापक बळीराम सोनवणे यांनी संशयित आरोपी शिक्षण विस्तार अधिकारी जे.डी.पाटील यांना दहा हजार रुपये द्यावयाचे असून तुम्हाला पैसे द्यावेच लागतील असे सांगून तक्रारदाराकडून एक हजार रुपये स्विकारतांना मुख्याध्यापक कार्यालयातच पथकाने रंगेहाथ पकडले. यातील संशयित आरोपी शिक्षण विस्तार अधिकारी जे.डी.पाटील यांचेशी फोनद्वारे पडताळणी केल्यानंतर त्यांनी दोन हजार रुपये मिळाल्याबद्दल कोणताही विरोध दर्शवला नाही व नंतर कॉल करतो असे सांगून फोन ठेवून दिला.लाच मागणीमध्ये शिक्षण विस्तार अधिकारी जे.डी.पाटील यांचाही सहभाग असल्याच्या संशयावरून त्यांनाही संशयित आरोपी करण्यात आले आहे.लाच लुचपत प्रतिबंधक विभागाचे उपअधीक्षक योगेश ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक उपनिरीक्षक सुरेश पाटील,हवालदार बाळू मराठे राकेश दुसाने यांच्या पथकाने कारवाई केली. दरम्यान शिक्षण विस्तार अधिका–यांसाठी लाच स्वीकारणा–या मुख्याध्यापकास रंगेहाथ पकडल्यामुळे शिक्षण क्षेत्रात खळबळ उडाली असून शिक्षण विभागाचे धिंडवडे निघाले आहेत.याबाबत एरंडोल पोलीसस्थानकात रात्री उशिरापर्यंत गुन्हा नोंदवण्याचे काम सुरु होते.

# इयत्ता दहावी व बारावी

इयत्ता दहावी व बारावीच्या मित्रांनो , कसे आहात? मजेत आहात ना? आणि असलेच पाहिजे, मुलांनो आता फक्त तुम्हाला कबुतराचा डोळाच दिसतोय ना? म्हणजेच फक्त बोर्डाची परीक्षा दिसत असेल ना? आणि हो तुम्ही परीक्षेला घाबरत नाही ना, मला माहित आहे तुम्ही कोणीही परिक्षेला घाबरणार नाही, कारण परीक्षेला कोण घाबरते, ज्यांचा अभ्यास झाला नसेल तेच घाबरतात. तुमच्या सर्वांची शाळा व कॉलेजने उजळणी करून घेतली आहे, तसेच सराव परीक्षा घेतल्या आहेत, तुमच्या अभ्यासाचे नियोजन ही करून दिलेले आहे, आणि सराव परीक्षेचे पेपर सुद्धा तुम्ही बघितलेले आहेत.म्हणजे आता आपण कुठे बरोबर आहे, कुठे कमी पडतो हे माहीत झाले आहे, त्याप्रमाणे पुढील अभ्यासाची दिशा ठरवा,त्या प्रमाणे अभ्यास करा, बस एवढंच करायचं आहे आणि भरघोस मार्क मिळवायची, आणि चांगली मार्क मिळणारच हे नक्की आहे, कारण आई व वडील आणि शिक्षक यांचे आशीर्वाद पण आहेत.

आणि हो काही जणांचा, काही कारणांमुळे अभ्यास झाला नसेल, तर त्यांच्या मनावर मात्र आता हॉल तिकीट पाहून ताण आला असेल, की आता काय करायचं, पण बाळांनो अजिबात घाबरू नका, कारण आपण खूप कमी वेळेत सुद्धा इकडची दुनिया तिकडे करू शकतो, ही तर फक्त बोर्डाची परीक्षाच आहे ना,

बर ऐका आता काय करायचं ते,आता तुम्ही फक्त परिक्षेपर्यंतच्या उरलेल्या दिवसांचे व विषयांच्या अभ्यासाचे तंतोतंत नियोजन करा, अवघड वाटणारे व सोपे वाटणारे विषय यांना किती दिवस मिळतात ते मोजून ठरवा, तुम्हाला महत्त्वाचा वाटणारा असा मोजकाच अभ्यास करा किंवा , तुम्हाला प्रश्नपत्रिकेचे स्वरूप माहीती आहे त्याप्रमाणे तीन ते चार प्रश्नपत्रिका मन लावून व बघून सोडवा आणि एक प्रश्नपत्रिका वेळ लावून न बघता सोडवा, तुम्हाला खूपच समाधान वाटेल आणि परीक्षेसाठी तुमच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण होईल. कोणते प्रश्न सोडवायचे हे नक्की ठरवा व तेवढाच अभ्यास करा. तुम्ही सगळेजण नक्की पास होणारच यामध्ये काहीही शंका नाही. कष्टाला पर्याय नाही हे मात्र नक्की लक्षात असू द्या. जर यामध्ये काही अडचण येत असेल तर आपल्या विषय शिक्षकाना भेटा किंवा संपर्क करा आणि मार्गदर्शन घ्या, ते तुम्हाला नक्कीच मदत करतील कारण ते शिक्षक आहेत.

**श्री जे. के. कुंभार सर**
**(माजी पर्यवेक्षक के. आ.बांठिया माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय नवीन पनवेल.)**

# स्नेहकुंज आधार गृह येथे करण्यात आला मुलीचा वाढदिवस साजरा

दैनिक युवक आधार पनवेल, (वार्ताहर)
सद्गुरु आचरणातील पाटील परिवारातील देवेंद्रभाऊ पाटील यांनी आपल्या कन्येचा वाढदिवस हॉटेल किंवा रिसॉर्टला न ठेवता सामाजिक बांधिलकी म्हणून ने स्नेहकुंज आधार गृह नेरे येथे वृद्धांच्या सहवासात स्नेह भोजनात साजरा करत युवा पिढीला एक आदर्श घालून दिला आहे.
आपल्या कन्येचा वाढदिवस सामाजिक बांधिलकीद्वारे जपण्याच्या उद्देशाने देवाभाऊ पाटील यांनी विविध समाजातील मान्यवरांना एकत्रित करून स्नेहकुंज आधार गृह नेरे येथे जावून तेथील वृद्धांच्या सहवासात स्नेहभोजन करत आपल्या कन्येचा वाढदिवस आगळ्या वेगळ्या पद्धतीने साजरा केल्याबद्दल समाजात त्यांचे कौतुक करण्यात येत आहे.




## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटीशीने कळविण्यात येते की, श्री. चंद्रकांत चांगु ठाकूर, व इतर मौजे. न्हावे, ता. पनवेल, जि. रायगड येथील गट क्र. अ/907, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाकरीता संपादित झाली आहे व त्याबदल्यात शहर आणि औदयोगिक विकास महामंडळ महाराष्ट्र मर्यादित (सिडको) यांनी पुन:र्वसन योजनेअंतर्गत खालील वर्णन केलेला भूखंड भाडेपट्टयाचे कराराने दीर्घ मुदतीच्या भाडेपट्टयाने दिलेला होता. सदरहू भूखंडाचे वर्णन खालीलप्रमाणे:-

**भूखंडाचे वर्णन**

| नोड | भुखंड क्रमांक | सेक्टर क्रमांक | क्षेत्रफळ चौ.मी. |
|---|---|---|---|
| उलवे | ए/3 | 16 | 549.60 चौ. मीटर |

वर्णन केलेल्या भूखंडास यापुढे सोयीकरता "**सदरहू भूखंड**" असे संबोधिले आहे.

सदरहू वरील भूखंड श्री. चंद्रकांत चांगु ठाकूर, व इतर यांचे मालकीचे होते. सदरहू भुखंड श्री. चंद्रकांत चांगु ठाकूर, व इतर यांनी मे. जी. व्ही. इंटरप्रायझेस तर्फे श्री. गिरिष अशोक खानावकर यांचे लाभांत कराराने विक्री केलेला आहे, तरी मे. जी. व्ही. इंटरप्रायझेस तर्फे श्री. गिरिष अशोक खानावकर यांनी सदरचा भुखंड हा मे. व्ही. ॲण्ड व्ही. डेव्हलपर्स तर्फे श्री. पियुष एम. सुराना व श्री. अनिल आर. सुराना यांना विकसनाकरीता देण्याचे ठरविले आहे. तरी सदरहू भूखंडाबाबत कोणाचाही दान, गहाण, बक्षिस, फरोक्त अगर अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी त्याबाबत आवश्यक त्या साक्षांकित कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे नोटीस प्रसिध्द झाल्यापासून 15 दिवसांत लेखी हरकत नोंदवाव्यात.

या नोटीशीत नमूद केलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत आली नाही, तर सदरहू भूखंडावर विकसन करण्याची तजवीज पूर्ण केली जाईल व मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

ठिकाण : पनवेल,
दि. - 22/01/2025

(एम. पी. सचदेव)
वकील.
**पत्ता :** शॉप नं. ३ झुलेलाल आस्था रेसिडेन्सी सी.एच.एस. ऑप. अबीदिप बिल्डींग, कोळीवाडा रोड, पनवेल 410 206, जि. रायगड, फोन नं. 9326111111.


# करियर मार्गदर्शन व तंत्रज्ञान विषयक माहिती उदबोधन वर्ग संपन्न

**दैनिक युवक आधार रोहा/ वार्ताहर**
सिद्धराज कंप्यूटर इन्स्टिट्यूट चणेरा यांच्याकडून करियर मार्गदर्शन व तंत्रज्ञान विषयक उद्‌बोधन वर्ग न्यू इंग्लिश स्कूल चनेरा ता. रोहा जि. रायगड येथे घेण्यात आले. यावेळी सिद्धराज कंप्यूटर इन्स्टिट्यूटच्या संचालिका स्वाती सिद्धेश रणदिवे यांनी विद्यार्थ्यांना तंत्रज्ञान विषयक माहिती सांगितली .याचबरोबर भविष्यामध्ये करिअरची संपूर्ण माहिती सांगितली .स्पर्धा परीक्षेची माहिती दिली. त्याचबरोबर एमएससीआयटी कोर्स किती महत्त्वाचा आहे एमएससीआयटी कोर्स मध्ये झालेले बदल याविषयी संपूर्ण माहिती दिली. सर्व विद्यार्थ्यांनी सिद्धराज कम्प्युटर इन्स्टिट्यूट चणेरा येथे प्रवेश घ्यावा असे आव्हान संचालिका स्वाती सिद्धेश रणदिवे यांनी केले. एम .बी .मोरे कॉलेज कोलाड येथील प्राध्यापिका माधुरी जाधव यांनी येत्या शैक्षणिक वर्षांमध्ये नवीन शैक्षणिक धोरण राबविण्यात येत आहे .त्या शैक्षणिक धोरणाविषयी संपूर्ण माहिती दिली. व्यावसायिक शिक्षण किती महत्त्वाचे आहे . आधुनिक शिक्षण, शिक्षणाचे महत्त्व, विषयाची निवड, विषयावर आधारित कौशल्य, याविषयी विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. यावेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक के. बी. पाटील यांनी उपस्थित सर्व मान्यवरांचे आभार मानले.



## ‘ओव्हरनाईट’ पिंपल हटवण्याचा हमखास घरगुती उपाय!

**घरात** एखादा लग्न-समारंभ किंवा तुम्ही एखाद्या पाटीर्साठी एक्साईट असतानाच अचानक येणारा ‘पिंपल’ तुमच्या साया आनंदावर पाणी फिरवून जातो. अशावेळी नकळत तो फोडण्याचा मोह अनेकांना होतो. पण यामुळे चेर्हयावर डाग पडण्याचे तसेच त्वचेखाली इन्फेक्शन वाढण्याचा धोका अधिक असतो. मग झटपट पिंपल हटवण्यासाठी काही महागड्या ब्युटी ट्रीटमेंट्स किंवा क्रिम्स लावण्याऐवजी ‘चंदन आणि गुलाबपाणी’ हा घरगुती उपाय नक्कीच तुम्हांला फायदेशीर ठरेल.



### चंदन - गुलाबपाणी : जादूई उपाय

- चंदन पावडरमध्ये थोडेसे गुलाबपाणी मिसळून त्याची पेस्ट बनवा.
- जर तुमच्याकडे चंदनाची काडी असेल तर ती सहाणेवर उगळा. व त्याला भिजवताना काही थेंब गुलाबपाण्याचे टाका.
- ही पेस्ट पिंपलवर लावा.
- रात्रभर सुकू द्या व सकाळी उठून चेहरा स्वच्छ धुवा.

## घरात मनीप्लांट लावण्याचे सात तोटे जाणून घ्या

**बहुतेक लोक त्यांच्या घरात मनी प्लांट लावतात कारण असे मानले जाते की ते पैसे आकर्षित करते. मनी प्लांटला जास्त पाणी दिल्याने त्याची मुळे कुजतात आणि त्यावर बुरशीची वाढ होते. मात्र, घरामध्ये मनी प्लांट लावण्याचे अनेक तोटे आहेत, त्यापैकी 7 प्रमुख तोटे जाणून घ्या.**



**बुरशीजन्य संसर्ग:**
जेव्हा मनी प्लांटला बुरशीची लागण होते तेव्हा ते बुरशीजन्य रोग आणि ऍफिड्स, मेलीबग्स आणि स्पायडर माइट्स यांसारख्या वनस्पती कीटकांमुळे संक्रमित होण्याचा धोका वाढतो, जे आरोग्यासाठी धोकादायक असतात.

**पाळीव प्राणी:**
मनी प्लांट घरगुती पाळीव प्राण्यांच्या आरोग्यास हानी पोहोचवते कारण त्यात कॅल्शियम ऑक्सलेट क्रिस्टल्स असतात. यामुळे मुलांनाही नुकसान होऊ शकते.

**गुंतलेले मनी प्लांट:**
मनी प्लांटची काळजी घेणे महत्वाचे आहे. वेळोवेळी, त्याच्या वेलीला दिशा दाखवून पसरवावी लागते, अन्यथा ती एकमेकांमध्ये अडकते, कुरळे होते आणि खाली वाकते. वास्तुनुसार हे योग्य मानले जात नाही.

**योग्य दिशा निवडावी :**
वास्तुशास्त्रानुसार घरामध्ये योग्य दिशेला हे रोप लावले नाही तर आर्थिक नुकसानही सहन करावे लागते. मनी प्लांट कधीही ईशानमध्ये म्हणजेच ईशान्य दिशेला लावू नये. ही शुक्राची वनस्पती आहे. ही दिशा त्याच्यासाठी सर्वात नकारात्मक मानली जाते, कारण ईशान्य दिशेचा प्रतिनिधी देवगुरू बृहस्पति मानला जातो आणि शुक्र आणि बृहस्पति यांच्यात वैमनस्यपूर्ण संबंध आहे. त्यामुळे शुक्राशी संबंधित ही वनस्पती ईशान्य दिशेला असल्यास नुकसान होते. त्यातून नाती बिघडतात.

**मज्जातंतूंवर परिणाम होतो:**
मनी प्लांटचा आपल्या नसांवर परिणाम होतो असाही एक लोकप्रिय समज आहे. जर ते योग्य वरच्या दिशेने विकसित होत असेल तर ते चांगले आहे, अन्यथा ते हानिकारक आहे.

**योग्य रोपे जवळ ठेवा:**
मनी प्लांट ही शुक्राची वनस्पती आहे असे म्हणतात, त्यामुळे शुक्राच्या शत्रू ग्रहांची रोपे जवळ लावू नयेत. मंगळ, चंद्र आणि सूर्य यांच्या वनस्पतीप्रमाणे.

**हे रोप दुसऱ्यांना देऊ नका:**
असं म्हटलं जातं की जर एखाद्या व्यक्तीने आपल्या घराचा मनी प्लांट दुसऱ्याला वाढवायला दिला तर त्याच्या घरातील नशीब किंवा आशीर्वाद निघून जातात.

## जगातील सर्वात पातळ फोन येतोय बाजारात; ॲपल-सॅमसंग नव्हे तर ही कंपनी करणार कमाल



**ओप्पो पुढील महिन्यात चीनमध्ये ओप्पो फाइंड एन५ हा जगातील सर्वात पातळ फोल्डेबल स्मार्टफोन लॉंच करणार आहे. फोनमध्ये स्नॅपड्रॅगन 8 एलीट चिपसेट, ६००० एमएएच बॅटरी, २के रिझॉल्यूशन स्क्रीन दिली जाईल. याच्या रियर कॅमेरा सेटअपमध्ये 50 मेगापिक्सलचा प्रायमरी कॅमेरा, अल्ट्रा-वाइड लेन्स आणि पेरिस्कोप टेलीफोटो कॅमेरा असतील.**

ओप्पो पुढील महिन्यात आपल्या फोल्डेबल स्मार्टफोन प्रोडक्ट पोर्टफोलियो वाढवणार आहे, त्यासाठी कंपनी नवीन ओप्पो फाइंड एन५ स्मार्टफोन चीनमध्ये लॉंच करेल. विशेष म्हणजे ब्रँडच्या प्रोडक्ट मॅनेजरनं या फोनचा एक टीजर शेयर केला आहे. त्यानुसार हा डिव्हाइस जगातील सर्वात पातळ फोन ठरेल. चला, जाणून घेऊया या फोनची खास माहिती.

### ओप्पो फाइंड एन५ चा टीजर

ओप्पोचे चीफ प्रोडक्ट ऑफिसर आणि वनप्लसचे संस्थापक पीट लाउ यांच्या मते ओप्पो फाईंड एन5 जगातील सर्वात पातळ फोल्डेबल फोन असेल. मोबाइलच्या जाडीचा अंदाज यावा म्हणून कंपनीनं याची तुलना एका पेन्सिलशी केली आहे.

याचा अर्थ असा की आगामी ओप्पो फाइंड एन५ अनफोल्ड केल्यावर एका पेन्सिल पेक्षा पातळ असेल. स्मार्टफोनची जाडी जवळपास 7 मिमी असेल. ओप्पो फाइंड एन५ अनफोल्ड झाल्यावर जवळपास 4 मिमी इतका जाड असू शकतो. तर फोल्ड केल्यावर ज्याची जाडी 10 मिमी पेक्षा कमी असू शकते.

### ओप्पो फाइंड एन५ चे संभाव्य स्पेसिफिकेशन्स

ओप्पो फाइंड एन5 मध्ये टायटेनियम बिल्ड मिळू शकते, ज्यामुळे हा मजबूत ठरू शकतो. फोनबद्दल अंदाज लावला जात अशी की हा आयपीएक्स८ रेटिंगसह येईल. विशेष म्हणजे 2023 मध्ये लॉंच झालेल्या फाइंड एन3 मध्ये आयपी रेटिंग नव्हती.

ओप्पो फाइंड एन५ मध्ये जवळपास ६००० एमएएच ची बॅटरी दिली जाऊ शकते. जी ८०वाट्स किंवा १००वाट्स फास्ट चार्जिंग आणि ५०वाट्स मॅग्नेटिक वायरलेस चार्जिंगला सपोर्ट करू शकते. दमदार परफॉरमेंससाठी मोबाइलमध्ये ब्रँड नवीन स्नॅपड्रॅगन 8 एलीट चिपसेटचा वापर करू शकते. फोन अँड्रॉइड 15 आधारित कलरओएस १५ वर चालू शकतो. रिपोर्ट्स नुसार ओप्पो फाइंड एन५ मध्ये २के रिझॉल्यूशन असलेली इंटरनल स्क्रीन मिळू शकते. डिवाइसच्या रियर कॅमेरा मॉड्यूलमध्ये ओआइएस टेक्नॉलॉजी असलेला 50 मेगापिक्सलचा प्रायमरी कॅमेरा, 50 मेगापिक्सलचा अल्ट्रा-वाइड लेन्स आणि ३एक्स ऑप्टिकल झूमला सपोर्ट असलेला 50 मेगापिक्सलचा पेरिस्कोप टेलीफोटो कॅमेरा मिळू शकतो. ओप्पो फाइंड एन५ जागतिक बाजारात कधी येईल याची माहिती अद्याप आली नाही. हा दक्षिण-पूर्व आशियातील काही देशांमध्ये लॉंच होऊ शकतो. तर अमेरिका, युरोप आणि भारतासारख्या देशांमध्ये वनप्लस ओपन २ नावाने रीब्रँड करून हा फोन सादर केला जाऊ शकतो.

## कोणत्याही त्रासाशिवाय जलद वजन कमी करा



**वजन** कमी करण्यासाठी अनेक उपाय आहेत, वजन कमी करण्यासाठी अनेक वेळा कठीण डायट, आणि व्यायाम केले जातात, तसेच आहारात देखील बदल केले जातात, अनेक वेळा काय खायचं आणि नाही खायचं असा प्रश्न पडतो, आणि डायटची वाट लागते आणि वजन पुन्हा वाढता वाढता वाढे वाढत जातं.

**एक चांगला उपाय आहे**
यावर एक चांगला उपाय आहे, तसा उपाय अतिशय साधा सोपा आहे, गरज आहे फक्त सातत्याची आणि संयम ठेवण्याची. हा प्रयोग तुमचा वर्षभर तरी चालणार आहे, या दरम्यान शरीराला कोणताही अपाय न होता, तुमचं वजन कमी होत जाणार आहे, हा तुम्हाला निश्चितच आश्ययार्चा धक्का असणार आहे.

**सातत्य असायला हवंच**
ग्लासभर पाण्यात चार बोटांवर बसतील एवढ्या ओवा रोज रात्री टाका, सकाळी उठल्यावर हे पाणी प्या, प्यायला जड जात असल्याचं थोडं सैंदव मीठ टाका, हे नियमित करा, बाहेरगावी प्रवासाला गेलात तरी रात्री बाटलीत ओवा टाका, सकाळी शक्य झाल्यास हे पाणी कोमट करा आणि प्या.

**शरीराची चयापचय क्षमता प्रचंड वाढते**
तुमची शरीराची चयापचय क्षमता यानंतर प्रचंड वाढेल, नेहमीपेक्षा जास्त भूक तुम्हाला लागेल, इतर अपचानाचे त्रास कमी होतील, आणि तुमचं वजन झटपट उतरण्यास सुरूवात झाली असेल, फक्त सातत्य सोडू नका.

## चमकदार दातांसाठी झोपण्याच्या वेळेस करा ही कामे



**आजच्या** जाहिरातीच्या युगात सारेच टुथपेस्ट ब्रॅन्ड चमकदार दातांचा दावा करतात. डेन्टिस्टकडे चमकदार दातांसाठी अनेक ट्रीटमेंट उपलब्ध असतात. पण अनेक घरगुती उपायांनीही तुम्ही तुमचे दात चमकदार बनवू शकता.

- नारळाचे तेल ऑरगॅनिक आणि नॅच्युरल टीथ व्हाईटनर आहे. नारळाच्या तेलाने तुम्ही तुमचे दात चमकवू शकता. यासाठी थोडेसे नारळाचे तेल घेऊन 15 मिनिटे तोंडात ठेवा. त्यानंतर साध्या पाण्याने चूळ भरा. यामुळे फायदा होईल.
- दात चमकवण्यासाठी सोपा उपाय म्हणजे स्ट्रॉबेरीज. स्ट्रॉबेरीच्या गरात चिमूटभर बेकिंग सोडा मिसळा. हे मिश्रण ब्रशवर घेऊन दात घासा. यामुळे दातांवरील पिवळेपणा दूर होईल.
- ॲपल सिडार व्हिनेगरही दात चमकावण्यात महत्त्वाची भूमिका बजावते. याचे काही थेंब दातांवर चोळा. अधिक फायद्यासाठी सकाळी ब्रश करण्याआधी या व्हिनेगरने दात चोळा.

## मिक्स व्हेज कोरमा

**साहित्य:**- अर्धी वाटी फ्लॉवर चे तुरे, अर्धी वाटी मटार दाणे किंवा मक्याचे दाणे, दोन मध्यम बटाटे नेहेमी प्रमाणे कार्चया करून पाण्यात घालून ठेवणे. सालासकटही वापरले तरी चालतील, एक मध्यम मोठा कांदा, नेहेमीप्रमाणे चौकोनी चिरून, दोन मध्यम सिमला मिरच्या, चौकोनी चिरून, दोन मध्यम टोमॅटो, चौकोनी चिरून, अर्धी वाटी पनीर चे क्यूब्स (लहान लहानच हवेत) हे ऑप्शनल आहेत; शक्यतो मी वापरत नाही, अर्धी वाटी गाजराचे लहान लहान क्यूब्स, पाव चमचा गरम मसाला किंवा पावभाजी मसाला, १ टीस्पून जिरा पावडर आणि १ टीस्पून धणा पावडर, १ टीस्पून लाल तिखट, पाव टीस्पून हळद, चवीनुसार मीठ, तेल, चिमूटभरच जिरं.

**पाककृती:**- ही भाजी लोखंडी कढईत मस्त होते; सो लोखंडी कढई सणसणून तापवावी. जरा जास्तच तेल घेऊन चिमूटभर जिरं घालून फोडणी करावी आणि त्यात कांदा घालावा. कांदा जरा गुलबट - पारदर्षक झाला की टोमॅटो घालून मसाला पूर्ण गळू द्यावा. मसाल्याला चांगलं तेल सुटलं की सगळे कोरडे मसाले आणि चिरून ठेवलेल्या भाज्या, मटार /मका दाणे इ. घालाव्यात आणि ३ - ४ मिनिटं मोठ्याच आचेवर परतत राहावं. आता यात पाव वाटी पाणी घालून मंद आचेवर झाकण घालून भाजी शिजू द्यावी. नंतर मीठ आणि गरम मसाला घालून नीट हलवून घ्यावी. गरम गरम भाजी तेल/तूप लावलेल्या गरमच फुलक्यांबरोबर किंवा तव्यावरून ताटात अश्या पराठ्यांसोबत खावी. नाश्त्याला किंवा ब्रंचला म्हणून मस्त प्रकार आहे.



**अधिक टिपा:**

- तेल, तिखट जरा जास्त हवं तरच चव स्वर्गीय येते
- भाज्यांमध्ये उन्नीस-बीस चालेल पण अपेक्षित चव यायला गरम मसाला, सिमला आणि टोमॅटो वगळू नका
- ही भाजी गरमच चांगली लागते आणि हो, जरावेळ मसाल्यात परतणं ही आवश्यक आहे
- अगदी गीर्र अशी ही शिजवायची नाही
- बाकी लाडात असाल तर काजूपेस्ट, क्रीम, इतर वाटणं घाटणं वगैरे बिन्नेस करू शकता

## ‘या’ चुकीच्या सवयींमुळे केस होतात पातळ

**महिलांचे सौंदर्य त्यांच्या केसातच असते असे म्हटले जाते. आपले केस जाड, काळेभोर आणि लांब असावेत असे बहुतांश स्त्रियांना वाटते. पण प्रदूषण, शाम्पूचा वापर आणि इतर अनेक कारणांनी केसांचा पोत खराब होतो. परिणामी केस पातळ होण्यास सुरुवात होते. मग कधी पार्लरमध्ये जाऊन विविध उपचार घेतले जातात किंवा बाजारात मिळणाऱ्या सौंदर्यप्रसाधनांचा वापर केला जातो. पण या गोष्टींमुळे केस आणखी खराब होण्यास सुरुवात होते. याबरोबरच काही चुकीच्या सवयी केस पातळ होण्यास कारणीभूत ठरतात. आता अशा कोणत्या चुकीच्या सवयींमुळे केस पातळ होतात पाहूया...**

### ओले केस विंचरणे

केस ओले असताना त्यांच्या गळण्याचे प्रमाण जास्त असते. त्यातच ओले केस विंचरले तर ते मूळापासून हलके होतात आणि जास्त प्रमाणात गळतात. केस सतत गळत असतील तर सहाजिकच ते पातळ होतात. त्यामुळे ओले केस न विंचरता ते कोरडे होऊ द्यावे आणि मगच विंचरावे.



### केस घट्ट बांधणे

कधी उकाडा म्हणून तर कधी इतर कोणत्या कारणाने काही जणी केस घट्ट बांधतात. एका मर्यादेपेक्षा जास्त घट्ट केस बांधल्याने केसांच्या मूळांवर ताण येतो आणि केस तुटण्याची शक्यता असते. त्यामुळे केस हळूवार बांधणे आवश्यक असून घट्ट बांधणे टाळावे.

### ठराविक काळाने केस न कापणे

ठराविक काळाने केस कापणे हे केसांच्या आरोग्याच्या दृष्टीने चांगले असते. केस कापल्यामुळे त्यांची वाढ चांगली होते तसेच त्यांचे आरोग्य चांगले राहण्यास मदत होते. त्यामुळे तुम्ही केस कापण्याकडे दुर्लक्ष करत असाल तर तसे करणे तत्काळ थांबवा आणि ठराविक काळाने केस कापण्यास विसरु नका.



### दिर्घकाळ केस न धुणे

ठराविक काळाने केस धुणे हे केसांच्या आरोग्यासाठी अतिशय चांगले असते. परंतु काही जणांना केस धुण्याचा कंटाळा असतो किंवा काही कारणाने केस धुणे राहून जाते. मात्र अशाने केसांचा पोत खराब होतो आणि केस गळण्याचे प्रमाण वाढते. त्यामुळे ठराविक अंतराने केस धुणे आवश्यक आहे. तुम्ही वापरत असलेला शाम्पू जास्त कोरडा असेल तरीही केस गळण्याचे प्रमाण वाढते. त्यामुळे आपल्या केसांचा पोत लक्षात घेऊन त्याप्रमाणे शाम्पू वापरावा.

## त्वचेला चमकदार करण्यासाठी ग्लिसरीन आणि हळद

**साहित्य-**

- अर्धा किंवा एक चमचा ग्लिसरीन
- एक चिमूटभर हळद
- एक चमचा मध

**वापरण्याची पद्धत**

- ग्लिसरीन आणि हळद मधात मिसळून घट्ट पेस्ट बनवा.
- ही पेस्ट चेर्हयावर लावा आणि वाळल्यावर चेहरा पाण्याने धुऊन घ्या.
- आठवड्यातून एकदा हे वापरणे योग्य ठरेल.

**हे कसे कार्य करते?**
ग्लिसरीन आपल्या त्वचेला चांगले हायड्रेट करते आणि त्वचेला चमकदार करण्यात मदत करतं.



## गरोदर महिलांनी नक्की घ्या ‘या’ गोष्टींची काळजी

**कोणत्याही स्त्रीला आपण एका बाळाला जन्म देणार आहोत ही भावना नेहमीच सुखावत असते. बाळाला 9 महिने पोटात वाढवायचं आणि नंतर जन्म दिल्यावरही संगोपन करायचं, अशा अनेक जबाबदाऱ्या तिच्यावर असतात. परंतु, ती या सर्व जबाबदाऱ्या अगदी आनंदाने स्वीकारते आणि पारही पाडते. गरोदर असणारी महिला हिच्यावर स्वतःची आणि बाळाची अशा दोन जणांची जबाबदारी असते. त्यामुळे, तुम्हीही जर गरोदर असाल तर आपल्या पोटात असणाऱ्या बाळाची काळजी घ्याच पण आम्ही सांगणार असलेल्या ‘या’ 5 गोष्टींपासून दूर राहा. कारण या गोष्टी तुमच्या होणाऱ्या बाळासाठी ठरू शकतात घातक.**



- **आपल्या** घराचे जर रंगकाम होत असेल तर त्याआधी हे लक्षात घ्या की वॉल पेंट्स व त्यात वापरल्या जाणाऱ्या कलरिंग एजंट्समध्ये शिशाचे प्रमाण जास्त असू शकतो, ज्यामुळे जन्माचे दोष किंवा अकाली जन्म होण्याची शक्यता वाढू शकते. सॉल्व्हेंट्स किंवा फवारण्या नसलेली उत्पादने वापरण्याचा प्रयत्न करा आणि खोली चांगल्या प्रकारे हवेशीर ठेवा किंवा आपण हे करू शकत नसल्यास कोणालातरी हे काम करण्यास सांगा. अशा प्रकारे, आपण कोणत्याही संभाव्य समस्या टाळू शकता.
- डास चावायला आला की आपल्या हातात सहज मॉस्किटो रिपेलन्ट स्प्रे येतो. पण हाच स्प्रेय गरोदरपणी घातक ठरू शकतो. जरी ते सुरक्षित असले तरीही त्यांच्यात डीईईटी आणि इतर रसायनांचा समावेश असतो, जे त्वचेद्वारे जंतुनाशक होऊ शकते आणि म्हणूनच जेव्हा पोटात बाळ वाढत असतं तेव्हा सुरुवातीच्या काही महिन्यांमध्ये हे वापरणे टाळावे.
- सामान्यतः कीटक दूर करण्यासाठी वापरल्या जार्णाया डांबर गोळ्यांमध्ये 98% नेफ्थलीनचे प्रमाण असते, जे एक विषारी रसायन आहे. त्याचे दुष्परिणाम मळमळ, चक्कर येणे आणि गर्भाशयाशी संपर्कात आल्यास गंभीर आरोग्यविषयक आजार होऊ शकतात.
- गर्भवती महिलांनी शक्य तेवढे प्लास्टिकपासून दूर राहिले पाहिजे. कारण प्लास्टिकमध्ये फायथलेट्स सारख्या धोकादायक रसायनांचा शोध आढळला आहे. हे रसायन, गर्भामध्ये गंभीर समस्या निर्माण करू शकते.

## बेल फळाच्या रसाचे ‘हे’ आरोग्यदायी फायदे तुम्हाला माहीत आहेत का? पहा कोणत्या आजारावर मिळेल आराम

**आयुर्वेदामध्ये** बेल फळाचे आरोग्यदायी फायदे सांगण्यात आले आहेत. बेल फळाच्या रसाचे सेवन केल्याने अनेक आजारांपासून आराम मिळतो. बेल फळाचा रस प्यायल्याने आरोग्य तसेच आपलं सौदर्यं चांगलं राहण्यास मदत होते. बेलाचे फळ थंड असते. त्यामुळे आपल्या शरीरातील उष्णता कमी होण्यास मदत होते. बेल फळात प्रोटीन, थायमीन, रायबोफ्लेविन आणि व्हिटॅमिन सी सारखे काही पोषक तत्वे आढळतात. बेल फळाचा रस तुमच्या आरोग्यासाठी फारच फायदेशीर ठरतो. उन्हाळ्यात दररोज बेल फळाचा रस घेतल्यास मोठा फायदा होतो. आज या लेखातून आपण बेलाच्या रसाचे फायदे जाणून घेणार आहोत.

**बेल हा दक्षिण आशिया व आग्नेय आशिया या उष्णकटिबंधीय भूप्रदेशांत आढळणारा एक दिव्यवृक्ष आहे. भारतीय संस्कृतीत बेल वृक्षाला फार महत्व आहे. प्रत्येक शुभकार्याच्या प्रसंगी पूजनात बेलाच्या पानाचा वापर केला जातो. या वृक्षाची प्रजाती नष्ट होऊ नये म्हणून त्याला पुजेतही स्थान देऊन त्याचे अस्तित्व टिकविण्याचा प्रयत्न प्राचीन काळापासून केला जात आहे. पानांबरोबरच बेलाच्या फळालाही मोठे महत्त्व आहे.**

### बेल फळाचा रस पिण्याचे फायदे -

**गॅस आणि पोटदुखीच्या समस्येपासून सुटका-**
धावपळीच्या जीवनशैलीमुळे तसेच ऑफिसमध्ये तासनतास बसून राहिल्याने गॅस, पोटदुखी यांसारख्या समस्या उद्भवतात. तुम्हालाही गॅस आणि पोटदुखीची समस्या जाणवत असेल तर दररोज बेलाच्या फळाचा रस घ्या.

**हृदयरोगाच्या समस्येपासून सुटका -**
हृदयाच्या वेगवेगळ्या आजारांमुळे त्रस्त असलेल्या रुग्णांसाठी बेल फळाचा रस सेवन करणं फायदेशीर ठरतं. बेलाच्या रसात एक चमचा तूप टाकून हे मिश्रित दररोज पिल्यास हृदयरोगाच्या समस्येपासून सुटका होण्यास मदत होते.



**रक्त शुद्ध करण्यास मदत -**
तुमचं रक्त साफ नसल्याने तुम्हाला वेगवेगळे आजार उद्भवण्याची शक्यता असते. रक्त शुद्ध करण्यासाठी दररोज बेलाचा रस आणि त्यात दोन थेंब मध मिश्रित करुन घ्या. असे केल्याने तुमचं रक्त शुद्ध होईल आणि तुम्हाला त्वचेसंबधित कोणतेही आजार उद्भवणार नाहीत.

**कोलेस्ट्रॉल नियंत्रित राहण्यास मदत -**
तुमच्या रक्तामध्ये कोलेस्ट्रोलचे प्रमाण जास्त असल्यास ते नियंत्रित ठेवण्यास बेलाचा रस फायदेशीर ठरतो. बेल फळाच्या रसाने कोलेस्ट्रॉल नियंत्रित ठेवण्यास मदत होते. तसेच यामुळे मधुमेहाची समस्याही कमी होते.

**ॲसिडिटीपासून सुटका-**
तुम्हाला अपचनाचा त्रास होत असल्यास बेलाचा रस फायदेशीर ठरतो. बेलाच्या रसाचे सेवन केल्याने ॲसिडिटीची समस्या दूर होते. तसेच पोटाच्या सर्व समस्या दूर होण्यास मदत होते.

## अंतराळातील धुळीची दाट चादर ‘जेम्स वेब’ दुर्बिणीने टिपली

**आज आम्ही तुम्हाला एक खास माहिती सांगणार आहोत. सुमारे 350 वर्षांपूर्वी एका ताऱ्याच्या नुकसानीमुळे प्रकाश, वायू आणि धूळ बाहेर पडली असून आतापर्यंत बराच पल्ला गाठला आहे. ताऱ्याच्या स्फोटानंतर अतिशय तीव्र क्ष-किरण आणि अल्ट्राव्हायोलेट प्रकाश निर्माण झाला आहे. नासाच्या जेम्स वेब स्पेस टेलिस्कोपने इन्फ्रारेड चमक असल्याचे निरीक्षण केले आहे. यामुळे अनेक तपशील उघड झाले आहेत. या निरीक्षणांमुळे आंतरतारकीय धूळ आणि वायूच्या खऱ्या ३डी इमेज मिळाल्या आहेत.**

आज आम्ही तुम्हाला अंतराळातील एका धुळीच्या चादरीची माहिती देणार आहोत. जेम्स वेब स्पेस टेलिस्कोपने वरून काढलेल्या छायाचित्रांमध्ये मोठ्या परिसरात गॅस आणि धुळीची दाट चादर पसरलेली दिसत आहे. एवढी सविस्तर रचना यापूर्वी कधीच पाहिली गेली नव्हती. यामुळे शास्त्रज्ञांना आंतरतारकीय प्रणालीविषयी अधिक माहिती मिळणार आहे. सुमारे 350 वर्षांपूर्वी एका ताऱ्याच्या स्फोटामुळे प्रकाश, वायू आणि धूळ बाहेर पडली असून आतापर्यंत बराच पल्ला गाठला आहे. ताऱ्याच्या स्फोटानंतर अतिशय तीव्र क्ष-किरण आणि अल्ट्राव्हायोलेट प्रकाश निर्माण झाला होता. बाल्टिमोरयेथील स्पेस टेलिस्कोप सायन्स इन्स्टिट्यूटचे जोश पीक यांनी सांगितले की, ‘आम्हाला कांद्यासारखे थर दिसतात. ‘‘आम्हाला वाटते की आपल्याला दिसणारा प्रत्येक घनदाट, धुळीचा प्रदेश आणि आपल्याला न दिसणारा बहुतेक भाग आतून असाच दिसतो. आम्ही याआधी कधीच त्यांच्या आत डोकावू शकलो नाही’.

‘‘तारा मरत असला तरी त्याचा प्रकाश टिकून राहतो. संपूर्ण विश्वात प्रतिध्वनित होतो. नासाचे जेम्स वेब स्पेस टेलिस्कोप प्रक्षेपित करून तीन वर्ष झाली आहेत. प्रत्येक प्रतिमा, प्रत्येक शोध, केवळ विश्वाच्या वैभवाचेच नव्हे तर नासाच्या टीमची शक्ती आणि आंतरराष्ट्रीय भागीदारीच्या आश्वासनाचे चित्र दर्शविते.

नासाचे सर्वात मोठे आंतरराष्ट्रीय अंतराळ विज्ञान सहकार्य असलेली ही अभूतपूर्व मोहीम नासाच्या कल्पकतेचा, टीमवर्कचा आणि उत्कृष्टतेच्या पाठपुराव्याचा खरा पुरावा आहे,’’ असे नासाचे प्रशासक बिल नेल्सन म्हणाले.

‘‘जगभरातील हजारो शास्त्रज्ञ आणि अभियंत्यांच्या अथक समर्पणामुळे आकाराला आलेल्या या भव्य प्रयत्नावर देखरेख ठेवणे ही किती भाग्याची गोष्ट आहे. या ताज्या चित्रात वेबचा चिरंतन वारसा सुंदररित्या टिपला गेला आहे. येणाऱ्या पिढ्यांना प्रेरणा देणारे मिशन.’’ असे नासाचे प्रशासक बिल नेल्सन म्हणाले. एकेकाळी एका प्रचंड ताऱ्याचा गाभा कोसळला आणि बाहेरून स्फोट घडवून आणणारी शॉकवेव्ह निर्माण झाली आणि तो तारा जाताजाता तुटला. शॉकवेव्ह जेव्हा ताऱ्याच्या पृष्ठभागापर्यंत पोहोचली, तेव्हा ती आत घुसली आणि एक्स-रे आणि अल्ट्राव्हायोलेट प्रकाशाची संक्षिप्त, तीव्र नाडी तयार झाली. ही आजूबाजूच्या अवकाशात बाहेरच्या दिशेने गेली. सुमारे 350 वर्षांनंतर प्रकाशाची ती नाडी आंतरतारकीय पदार्थापर्यंत पोहोचली आहे, ती प्रकाशमान झाली आहे, गरम झाली आहे आणि इन्फ्रारेड प्रकाशात चमकत आहे.



### जेम्स वेब स्पेस टेलिस्कोप म्हणजे काय?

जेम्स वेब स्पेस टेलिस्कोप सुमारे 10 हजार कोटी रुपये खर्च करून तयार करण्यात आला आहे. ही अंतराळ वेधशाळा आहे, जी 2021 मध्ये प्रक्षेपित करण्यात आली होती. जुलै 2022 पासून अंतराळात आपले काम सुरू केले आणि आतापर्यंत आपल्या अंतराळातील नवीन माहिती गोळा केली आहे.

2023 मध्ये जेम्स वेबने आतापर्यंतच्या सर्वात दूरच्या कृष्णविवराचा शोध लावला होता. तेव्हा नासाने म्हटले होते की, सीईईआरएस 1019 नावाच्या अंतराळात असलेल्या ‘बिग बँग’च्या घटनेनंतर 57 दशलक्ष वर्षांनंतर हे कथित कृष्णविवर तयार झाले असेल.